महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ६२ वे | दिनांक : २२/०२/२०२६ | वार : रविवार

## साताऱ्यात भाजपला रोखण्यासाठी सेना-राष्ट्रवादीचा 'हातमिळवणी'चा प्लॅन?



**सातारा** : राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सध्या आपल्या सातारा जिल्ह्यातील 'दरे' या गावी दोन दिवसांच्या विश्रांतीसाठी आले आहेत. हा दौरा वैयक्तिक असला तरी, सातारा जिल्हा परिषदेच्या सत्तास्थापनेचा पेच सुटत नसल्याने दरे गाव सध्या राजकीय घडामोडींचे केंद्र बनले आहे. जिल्हा परिषदेत सत्ता कोणाची येणार? यावरून जिल्ह्यात तर्क-वितर्कांना उधाण आले असून, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसने भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी एकत्र येणार असल्याची माहिती समोर आली आहे.

सातारा जिल्हा परिषदेच्या एकूण ६५ जागांपैकी बहुमतासाठी ३३ हा जादुई आकडा गाठणे आवश्यक आहे. मात्र, कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालेले नाही. भाजप २७, राष्ट्रवादी काँग्रेस २०, शिवसेना १६, स्वाभिमानी शेतकरी संघटना १, काँग्रेस १ आणि अपक्षाला १ जागा मिळालेली आहे.

निवडणुकीच्या काळात साताऱ्यात भाजप आणि शिवसेनेच्या स्थानिक नेत्यांमध्ये कमालीचा कडवटपणा पाहायला मिळाला होता. भाजप आणि शिवसेनेच्या स्थानिक नेत्यांमध्ये झालेल्या टोकाच्या टीकेमुळे दोन्ही पक्षांतील संबंध ताणले गेले आहेत. या पार्श्वभूमीवर, राष्ट्रवादी काँग्रेस (२०) आणि शिवसेना (१६) एकत्र आल्यास ३६ हे संख्याबळ गाठून सत्ता स्थापन करू शकतात. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, शिवसेनेचे मंत्री शंभूराज देसाई आणि राष्ट्रवादीचे मंत्री मकरंद पाटील यांनी मुंबईत एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती. या भेटीत शिंदेंनी साताऱ्यात या नव्या समीकरणाला हिरवा कंदील (Green Signal) दिल्याची चर्चा आहे.

दुसरीकडे, सर्वाधिक २७ जागा जिंकणारा भाजप सहज हार मानण्याच्या तयारीत नाही. "सातारा जिल्हा परिषदेचा अध्यक्ष भाजपचाच होईल यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वतः वरिष्ठ स्तरावर चर्चा करत आहेत," असे सांगत मंत्री जयकुमार गोरे यांनी महायुती म्हणून पुढे जाण्याची इच्छा व्यक्त केली. मात्र, तसे न घडल्यास "वेळ पडल्यास चमत्कार करून दाखवावा लागेल," असा सूचक इशाराही त्यांनी दिला आहे. जयकुमार गोरेंच्या या विधानामुळे साताऱ्यात पुन्हा एकदा 'ऑपरेशन लोटस' किंवा फोडाफोडी होणार का? अशी चर्चा रंगली आहे.

एकनाथ शिंदे दरे मुक्कामी असल्याने पुढील २४ तासांत शिवसेनेचे आणि राष्ट्रवादीचे जिल्ह्यातील दिग्गज नेते त्यांची भेट घेण्याची शक्यता आहे. या भेटीनंतरच साताऱ्याच्या सत्तेचे चित्र स्पष्ट होईल. भाजपला सत्तेपासून रोखण्यासाठी महायुतीतला हा अंतर्गत कलह साताऱ्याच्या राजकारणाला कोणती नवी दिशा देतो, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## राज्यसभेच्या जागेवरून राष्ट्रवादीत दावे-प्रतिदावे





**मुंबई** : देशातील ३७ आणि महाराष्ट्रातील ७ राज्यसभेच्या जागांसाठी पुढील महिन्यात निवडणूक होत आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये (शरद पवार गट) उमेदवारीवरून मोठे दावे-प्रतिदावे सुरू झाले आहेत. आमदार रोहित पवार यांनी आज दिल्लीत पत्रकार परिषद घेऊन एक खळबळजनक खुलासा केला. "अजितदादांना शरद पवारांनीच राज्यसभेवर जावे अशी इच्छा होती," असे म्हणत त्यांनी खासदार अमोल कोल्हे यांनी केलेला छगन भुजबळांच्या उमेदवारीचा दावा खोडून काढला आहे.

काही दिवसांपूर्वी खासदार अमोल कोल्हे यांनी गौप्यस्फोट केला होता की, दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणानंतर छगन भुजबळ यांना राज्यसभेवर पाठवण्याचे अजितदादांनी निश्चित केले होते. ओबीसी जनगणनेच्या मुद्द्यावर भुजबळांसारखा ज्येष्ठ नेता संसदेत असणे गरजेचे आहे, असे दादांचे मत असल्याचे कोल्हेंनी म्हटले होते.

मात्र, आज रोहित पवार यांनी याला छेद दिला. ते म्हणाले, "विलीनीकरण हा अजितदादांसाठी राजकीय नव्हे तर भावनिक प्रश्न होता. विलीनीकरणानंतर अमोल कोल्हे यांना प्रदेशाध्यक्ष करण्याचा आणि शरद पवारांना राज्यसभेवर पाठवण्याचा विचार दादांच्या मनात पक्का होता. पक्ष विलीनीकरणासाठी शरद पवार यांनी कोणतीही अट ठेवली नव्हती, असेही रोहित पवारांनी स्पष्ट केले. रोहित पवारांच्या या दाव्यामुळे आता राजकीय वर्तुळात नवी चर्चा सुरू झाली आहे.

अजित पवारांच्या विमान अपघाताबाबत रोहित पवार यांनी आज नवी दिल्लीत तिसरी पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी काही तांत्रिक पुरावे सादर करत हा केवळ अपघात नसून 'घातपात' असल्याची दाट शंका व्यक्त केली. वैमानिकाचा जाणीवपूर्वक वापर करून हा अपघात घडवून आणला गेल्याचा संशय रोहित पवारांनी व्यक्त केला. "केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री किंजरापू राममोहन नायडू आणि संबंधित विमान कंपनीच्या मालकाचे घनिष्ठ संबंध आहेत. त्यामुळे या प्रकरणाचा तपास निष्पक्ष होत नाही," असा आरोप करत त्यांनी मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली.

२ एप्रिल रोजी काही सदस्यांचा कार्यकाळ संपणार असल्याने राज्यातील सात जागांसाठीची निवडणूक महत्त्वाची ठरणार आहे. महाविकास आघाडीच्या वर्तुळात शरद पवार यांच्या नावाची चर्चा सुरू असतानाच रोहित पवारांच्या दाव्यामुळे संभाव्य उमेदवारीबाबत नवा राजकीय रंग चढला आहे. एकूणच, राज्यसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांतील राजकीय समीकरणे अजूनही अस्पष्ट असल्याचे चित्र असून, पुढील काही दिवसांत अधिकृत भूमिका स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

## अनधिकृत होर्डिंग काढताना मनपा कर्मचाऱ्याचा मृत्यू

**छत्रपती संभाजीनगर** : शहरातील अनधिकृत होर्डिंगवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या महानगरपालिकेच्या एका २७ वर्षीय कर्मचाऱ्यावर आज काळाने घाला घातला. मुकुंदवाडी परिसरात कारवाई दरम्यान लोखंडी होर्डिंगचा स्पर्श ३३ केव्ही उच्च दाबाच्या वीज वाहिनीला झाल्याने एका तरुण कर्मचाऱ्याचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य एक जण गंभीर जखमी झाला आहे. या घटनेमुळे महापालिका प्रशासनाचा हलगर्जीपणा पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला असून जाधव कुटुंबावर शोककळा पसरली आहे.

महानगरपालिकेकडून सध्या शहरभर अनधिकृत बॅनर्स आणि होर्डिंग्ज हटवण्याची मोहीम राबवली जात आहे. आज सकाळी ९:३० वाजेच्या सुमारास मुकुंदवाडी येथील हनुमान मंदिर परिसरातील एक अनधिकृत होर्डिंग काढण्याचे काम सुरू होते. अमोल दिनकर जाधव (२७) आणि रवी रणधीर रिडलॉन (३८) हे दोन्ही कर्मचारी मंदिरावरील लोखंडी फ्रेम असलेले होर्डिंग उतरवत होते. होर्डिंग खाली घेत असतानाच, लोखंडी फ्रेमचा समतोल बिघडला आणि ती जवळूनच गेलेल्या ३३ केव्हीच्या हायव्होल्टेज तारेला स्पर्श झाला. प्रचंड दाबाचा वीजप्रवाह फ्रेममध्ये उतरल्याने अमोल जाधव यांना भीषण धक्का बसला. त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले, मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

या घटनेत अमोल यांचे सहकारी रवी रिडलॉन हे देखील गंभीररीत्या भाजले असून त्यांना तातडीने सिग्मा हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. घटनेची माहिती मिळताच मुकुंदवाडी पोलीस आणि मनपाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली.

अवघ्या २७ वर्षांच्या अमोल जाधव यांचा अशा पद्धतीने मृत्यू झाल्याने त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. घटनेची माहिती मिळताच नातेवाईकांनी रुग्णालयात गर्दी केली होती. "प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळेच आमच्या मुलाचा जीव गेला," असा आरोप करत कुटुंबीयांनी तीव्र आक्रोश व्यक्त केला.

या दुर्दैवी घटनेनंतर महापालिकेच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. उच्च दाबाच्या वाहिन्यांजवळ काम करताना संबंधित विभागाशी समन्वय साधून वीज पुरवठा बंद करणे आवश्यक होते, ते का झाले नाही? कर्मचाऱ्यांकडे हातमोजे, हेल्मेट किंवा इन्सुलेटेड साधने होती का? एवढ्या जोखमीच्या कामाच्या वेळी तांत्रिक जाण असलेला वरिष्ठ अधिकारी तिथे उपस्थित होता का? असे अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २२ फेब्रुवारी २०२६


## "मर्मगंध आणि अंगत पंगत" हे दर्जेदार कवितासंग्रह कवियत्रीला भेट



**छत्रपती संभाजीनगर : (प्रतिनिधी)** प्रसिद्ध कवि तथा साहित्यिक अय्युब पठाण लोहगावकर यांची दर्जेदार आणि वास्तववादी आशयघन प्रौढ कवितासंग्रह "मर्मगंध" आणि बाल कवितासंग्रह "अंगत पंगत" ही पुस्तके ता. जि. संभाजीनगर तालुक्यातील शेकटा येथील जिल्हा परीषदेच्या शाळेतील उपक्रमशिल शिक्षिका तथा प्रसिध्द कवियत्री श्रीमती वैशालीताई कंकाळ - चव्हाण यांना अय्युब पठाण लोहगावकर यांनी रमजान महिन्याच्या पवित्र शुभमुहूर्तावर सन्मानपूर्वक भेट दिले. "मर्मगंध" या प्रौढ कवितासंग्रहात वास्तवादी व आशयघन असे एकूण ६० कविता असून "अंगत पंगत" हे रंगीत बालकविता संग्रहात बालकांच्या भावविश्वाला आनंद देणाऱ्या ४० कविता रंगीत व चित्रासह समावेश आहे. याप्रसंगी शिक्षिका श्रीमती वैशालीताई कंकाळ यांनी रमजान महिन्यात पवित्र रोझा सोडण्यासाठी लहान मुलांना आर्थिक रक्कमही या मोबदल्यात पठाणसरांच्या नातवाला भेट दिली.

## नेपाळमध्ये समीक्षाचा डंका; माउंट एव्हरेस्ट आंतरराष्ट्रीय तायक्वांदो अजिंक्यपद पटकावले



**दौलताबाद (जावेद अहमद) :** नेपाळ मधीलकाठमांडू येथे झालेल्या प्रतिष्ठित चौथ्या माउंट एव्हरेस्ट आंतरराष्ट्रीय तायक्वांदो अजिंक्यपद स्पर्धेत (G-1 रँकिंग) जीतो दिल्ली पब्लिकची विद्यार्थ्यांनी समीक्षा सुरेश सोनवणे हिने जागतिक तायक्वांदो-मान्यताप्राप्त G-1 आंतरराष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारी महाराष्ट्राची पहिली महिला कॅडेट खेळाडू बनून इतिहास रचला. नेपाळविरुद्धच्या रोमांचक अंतिम सामन्यात, तिने २-१ असा संघर्षपूर्ण विजय मिळवलाही उल्लेखनीय कामगिरी हे तिचे दुसरे आंतरराष्ट्रीय रँकिंग पदक आहे.तिचे प्रशिक्षक संतोष बसनेत यांनी तिच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल खूप आनंद व्यक्त केला. त्यांनी सांगितले की, सततच्या समर्पणामुळे, शिस्तबद्धतेने आणि लक्ष केंद्रित तयारीमुळे, समीक्षात ऑस्ट्रेलियातील ब्रिस्बेन येथे होणाऱ्या २०३२ च्या ऑलिंपिक खेळांसाठी पात्रता मिळवण्याची प्रबळ क्षमता आहे.समीक्षा सुरेश सोनवणे हिचे शाळेचे संस्थापक प्रा. डॉ. सुरेश सोनवणे, संचालक प्रा.निलेश सोनवणे, प्राचार्य सावित्री डकरे व मीरा देशपांडे यांनी तिच्या ऐतिहासिक आंतरराष्ट्रीय विजयाबद्दल अभिनंदन केले आहे. व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्यात.

# "भभुल्या" या प्रसिद्ध हिंदी नाटकाचे पुण्यात दमदार सादरीकरण



**पुणे :** महाराष्ट्र सरकार, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांनी आयोजित केलेल्या हिंदी नाट्य स्पर्धेत,रत्नकुमार सांभरिया लिखित आणि असलम युनूस दिग्दर्शित "भभुल्या" हे नाटक बागबान थिएटर ग्रुप, बागबान सामाजिक प्रतिष्ठान, गेवराई, जिल्हा बीड यांनी पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवन, पुणे येथे रसिक प्रेक्षकांसमोर सादर केले. १६ ते २७ फेब्रुवारी दरम्यान होणाऱ्या या स्पर्धेत पुणे केंद्रात २० नाटके सादर केली जात आहेत हे उल्लेखनीय आहे.यावर्षी पुणे केंद्रावर अंतिम फेरीत सादर होणारे हे मराठवाडा भागातील एकमेव हिंदी नाटक आहे. यामध्ये नाट्यशास्त्र विभाग डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने महत्त्वपूर्ण योगदान दिले, ज्यामध्ये विद्यार्थी आणि प्राध्यापक सहभागी झाले आहेत असे डॉ.गजानन दांडगे यांनी सांगितले. हे नाटक सामान्य लोकांबद्दल बोलते, नाटककाराने शक्तिशाली लोक असहाय्य लोकांवर कसे अत्याचार करतात यावर भाष्य केले आहे. नायक, धीयानाराम, एका मित्राने भेट दिलेल्या छोट्या बोकडाला आपले सर्वस्व समजून जगत असतो. १५ ऑगस्ट रोजी, मटण खाण्याची भूक प्रेमसुखला धीयानारामच्या झोपडीत घेऊन जाते आणि नंतर धीयानारामचा बोकडाला वाचवण्यासाठीचा संघर्ष नाटकांत आहे ज्याला लेखकाने "भभुल्या" असे म्हणले आहे. नाट्यमय घटकांनी भरलेले, हे नाटक समकालीन आहे आणि त्याचे साहित्यिक मूल्य देखील उच्च आहे देशभरात अनेक ठिकाणी अभ्यासक्रमांत या नाटकाचा समावेश आहे. दिग्दर्शन, अभिनय, प्रकाशयोजना, संगीत आणि वेशभूषा या बाबतीत हे नाटक आव्हानात्मक आहे. कलाकारांनी रंगमंचावर वास्तववादी सादरीकरणाने ते समृद्ध केले. दिग्दर्शक असलम युनूस म्हणाले की, "आज आधुनिक भारतीय रंगमंचावर वास्तववाद प्रतिबिंबित करणारी व तांत्रिक दृष्ट्या समृद्ध फार कमी नाटके लिहीली जात आहेत ज्यात सत्य आणि नाट्यमय घटकांची सांगड असते . रत्नकुमार सांभरिया लिखीत भभुल्यासारख्या नाटकांत ही पोकळी भरून काढण्याची शक्ती आहे." डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथील नाट्यशास्त्र विभाग आणि नाट्यशास्त्र विभाग, सौ .के.एस.के. महाविद्यालय बीड यांनी या नाटकाच्या निर्मिती प्रक्रियेत योगदान दिले हे विशेष.या नाटकात सहभागी कलाकार खालीलप्रमाणे धीयानाराम - शुभम कोल्हेराजा बाकरा - रोहन गोहेरेमांडवा - डॉ.गजानन दांडगेहेड कॉन्स्टेबल - विपुल भोळेएस. पी. - सूरज जैनमेम - साधना विठोरेपहेलवान - औदुंबर वानखडेआरोपी - विजय मस्केगावातील लोक - पांडुरंग शिंगारे, किशोर थोरात, संकेत बलांडेआणि इन्स्पेक्टरच्या भूमिकेत- असलम युनूसतांत्रिक कलाकार संगीत - विनोद आघाव,नेपथ्य - देवरे रामेश्वर, डॉ.गजानन दांडगे,प्रकाशयोजना - बाळू बटुले,रंगभूषा - कविता दिवेकर,वेशभूषा - पांडुरंग शिनगारे,स्टेज मॅनेजर - भूषण खोडके, साहेबराव पाटील आणि गजमल रावबा.


## जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २२ फेब्रुवारी २०२६


# जिल्हा परिषद शाळा माळीवाडा येथे संगणक कक्षाचे उद्घाटन



**दौलताबाद (जावेद अहमद) :** माळीवाडा जिल्हा परिषद शाळेत दि. १९ गुरुवारी रोजी केटीय अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय, नवी दिल्ली तसेच महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांच्या केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रम अंतर्गत संगणक कक्ष (ICT Lab) प्रकल्प वर्ष २०२५-२६ चे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते उत्साहात करण्यात आले.या अंतर्गत शाळेस दहा संगणक संच व एक प्रिंटर उपलब्ध करून देण्यात आला असून विद्यार्थ्यांना आधुनिक माहिती व संवाद तंत्रज्ञानाचे शिक्षण घेण्यासाठी सुसज्ज अशी संगणक प्रयोगशाळा उभारण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या शासकीय व शासकीय अनुदानित शाळांमध्ये राबविण्यात येणाऱ्या माहिती व संवाद तंत्रज्ञान प्रयोगशाळा (ICT Lab) प्रकल्पामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाची संधी उपलब्ध होणार आहे.उद्घाटन प्रसंगी सरपंच ज्योती मुळे, माजी पंचायत समिती सदस्या वनिता मुळे, ग्रामपंचायत सदस्य प्रवीण बर्डे, कमलबाई आस्वार, अनिता हेकडे, मुख्याध्यापक फेरोज तडवी, अनंत गोरे, नंदकिशोर मुळे, पाडे ताई, पोलीस पाटील प्रमोद साठे, अशोक मुळे, गणेश आस्वार, बाळू जगधने, ताराबाई तुपे योगेश आहेर आदी मान्यवर उपस्थित होते.मान्यवरांनी विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाचे महत्त्व पटवून देत या सुविधेचा योग्य वापर करण्याचे आवाहन केले. संगणक कक्षामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला नवी दिशा मिळणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## संघर्षाची वाट चालतांना

सदा सर्वदा तयार रहावे
संघर्षाची वाट चालतांना
शब्द बोलावे खूप जपून
सहकाऱ्यांशी बोलतांना. १

संघर्षाच्या वाटेवर
संकटे येतील अनेक
सदा स्वार होऊन जावे
प्रयत्नांच्या लाटेवर नेक. २

संघर्षाविना जीवनात
आनंद मिळणार नाही
संघर्षातून तरुणाई
यशस्वीतेचे स्वप्न पाही. ३

संकट म्हणजे संधी आहे
ठामपणे सामोरे जावे
संकटांना पुरून उरून
यशस्वीतेचे गीत गावे. ४

यशस्वीतेच्या मार्गावर
संकटे येतात जातात
यशस्वी झाल्यावर मात्र
यशाचे गोडवे सारे गातात. ५



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## टवटवीत मोगरा

टवटवीत मोगरा
देई आनंद
कोमलता पाहून
मन होई धुंद

पांढरा शुभ्र मोगरा
पानातून हसे
दुरून पाहता
जणू चांदण्या दिसे

घरादाराला मोगरा
सुगंध देई
दिवसभराची मरगळ
पळून जाई

भक्तिभावाने
देवाला वाहू
दु:ख विसरुनी
आनंदी होऊ

निसर्गाने दिला
कमालीचा सुवास
अत्तर साबण
सुगंधी प्रवास

रोज रोज मोगरा
दुसऱ्यासाठी फुलतो
परोपकार करा
जणू आपणास सांगतो



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103


# श्रीकृष्ण महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी




**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** तालुक्यातील गुंजोटी येथे श्रीकृष्ण महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभागाच्या वतीने श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त प्रा. डॉ. उमाकांत सूर्यवंशी यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. गुलाब राठोड हे होते तर प्रमुख उपस्थितीत प्रा. डॉ. रमेश मांदळे व प्रा.रामदास कोळी हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने जनजागरण करण्यासाठी शिवाजी महाराज यांच्या जयघोषात फेरी काढण्यात आली.त्यानंतर प्रमुख उपस्थितांच्या हस्ते श्री.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व कार्यक्रमाला सुरुवात झाली.यावेळी बोलताना प्रा. डॉ. उमाकांत सूर्यवंशी म्हणाले की, श्री छत्रपती शिवाजी महाराज हे एक महान विभूती असून सर्वसामान्य माणसाच्या अपेक्षांचे ऊर्जाकेंद्र होते. त्याचबरोबर ते कुण्या विशिष्ट समाजाचे प्रतिनिधित्व करत नसून, छत्रपती शिवाजी महाराज हे रयतेचे राजे होते. अनेक इतिहासकारांनी त्यांना विशिष्ट अशा प्रतिमेत कैद करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला आहे. पण स्वाभिमानातून स्वराज्य निर्माण करणारे रयतेचे राजे हे छत्रपती शिवाजी महाराज होते हे पहिल्यांदा महात्मा फुले यांनी सांगितले. त्यांनीच शिवाजी महाराज यांची समाधी शोधून काढली आणि पुण्यात सार्वजनिक जयंती साजरी केली. कुळवाडी भूषण म्हणून पहिला पोवाडा महात्मा फुले यांनीच लिहिला. छत्रपती शिवाजी महाराज हे महात्मा फुले यांचे आदर्श होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुद्धा छत्रपती शिवाजी महाराज यांना आपले आदर्श मांडले. शिवाजी महाराज यांची आदर्श प्रशासन व्यवस्था आणि तिचे प्रारूप हेच भारतीय संविधान आहे. स्वराज्यातील लोकशाही प्रशासन व्यवस्था आणि तिचे अचूक प्रारूप डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अतिशय आवडले होते म्हणूनच त्यांनी स्त्रियांना समान अधिकार दिले. आजघडीला आपली ही जबाबदारी आहे की शिवाजी महाराज यांचा केवळ जयघोष करून किंवा आदर्श मानून चालणार नाही तर प्रत्यक्ष त्याची अंमलबजावणी आपल्या जीवनात केली पाहिजे असे सांगून शिव, फुले आंबेडकरांची त्रिसूत्री प्रतिपादन केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. विनोद धनेराव यांनी केले तर आभारप्रदर्शन प्रा. डॉ. राजाराम निगडे यांनी केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ.गुलाब राठोड यांनी केला.राष्ट्रगीतानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २२ फेब्रुवारी २०२६


## पोलिस भरतीला आलेल्या तरुणाचा धावताना मृत्यू



**छत्रपती संभाजीनगर :** येथे सुरू असलेल्या पोलिस भरतीत एका २३ वर्षीय तरुणाचा १६०० मीटर धावताना मृत्यू झाल्याची अत्यंत दुर्दैवी घटना घडली आहे. देशसेवेचे स्वप्न उराशी बाळगून पोलिस होण्यासाठी आलेल्या या तरुणाचा मैदानावरच प्राण गेल्याने भरती प्रक्रियेला उपस्थित असलेल्या उमेदवारांवर शोककळा पसरली आहे. आज सकाळच्या सत्रात मैदानी चाचणी सुरू असताना ही घटना घडली.

मृत तरुणाचे नाव संग्राम धोंडीराम शिंदे असे असून तो सांगली जिल्ह्याचा रहिवासी होता. पोलिस दलात भरती होण्याचे त्याचे स्वप्न होते आणि त्यासाठी तो गेल्या काही महिन्यांपासून कठोर सराव करत होता. पोलिस भरती प्रक्रियेसाठी तो छत्रपती संभाजीनगर येथे दाखल झाला होता. आज सकाळी सुमारे ८.१५ वाजता शहरातील ग्रामीण पोलिस अधीक्षक कार्यालयाच्या मैदानावर १६०० मीटर धावण्याची चाचणी सुरू होती. त्यात सहभागी झालेल्या संग्रामने धाव सुरू केली; मात्र काही अंतर पार केल्यानंतर त्याला अचानक चक्कर आल्याचे सांगितले जाते.

धावत असतानाच तो मैदानावर कोसळला. ही बाब लक्षात येताच तेथे उपस्थित पोलिस कर्मचारी आणि वैद्यकीय पथकाने तात्काळ धाव घेतली. त्याला प्राथमिक उपचार देण्यात आले आणि तातडीने जवळच्या रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर त्याला मृत घोषित केले. या घटनेनंतर भरती प्रक्रियेत काही काळ खंड पडला आणि उपस्थित उमेदवारांमध्ये भीती पसरली.

संग्राम शिंदे हा अत्यंत जिद्दी व मेहनती तरुण असल्याचे त्याच्या सहकाऱ्यांनी सांगितले. पोलिस दलात दाखल होऊन कुटुंबाची परिस्थिती सुधारण्याचा त्याचा निर्धार होता. मात्र नियतीने त्याचे स्वप्न अधुरे ठेवले. त्याच्या अकाली निधनामुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. दरम्यान, त्याच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. प्राथमिक अंदाजानुसार हृदयविकाराचा झटका किंवा तीव्र शारीरिक ताण यामुळे ही घटना घडली असावी, अशी शक्यता वर्तवली जात आहे; मात्र अधिकृत कारण शवविच्छेदन अहवालानंतरच स्पष्ट होणार आहे. पोलिस प्रशासनाने या घटनेची नोंद करून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू केली आहे.

## गावगाडा पुन्हा सरपंचांच्याच हाती : मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर विद्यमान सरपंच हाच 'प्रशासक'



**मुंबई :** राज्यातील ग्रामपंचायतींच्या निवडणुकांना होणारा विलंब आणि प्रशासकीय कामात येणारे अडथळे दूर करण्यासाठी राज्य सरकारने एक अत्यंत महत्त्वाचा आणि धाडसी निर्णय घेतला आहे. ज्या ग्रामपंचायतींची मुदत २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत संपत आहे, अशा ठिकाणी आता बाहेरचा कोणताही सरकारी अधिकारी प्रशासक म्हणून येणार नाही. त्याऐवजी, तेथील विद्यमान सरपंचालाच प्रशासक म्हणून नियुक्त करण्याचे आदेश ग्रामविकास विभागाने जारी केले आहेत.

निवडणूक प्रक्रियेला विविध कारणांमुळे विलंब होत असल्याने ग्रामपंचायतींमध्ये प्रशासकीय पोकळी निर्माण होण्याची शक्यता होती. आतापर्यंत सरकारी अधिकाऱ्यांकडे प्रशासक पद दिल्याने स्थानिक प्रश्नांची जाण नसल्यामुळे विकासकामे ठप्प होत असल्याच्या तक्रारी येत होत्या. नव्या निर्णयामुळे गावातील कामकाजात सातत्य राहणार असून विकासकामांना गती मिळेल, असा विश्वास सरकारने व्यक्त केला आहे.

**•सरपंच होणार प्रशासक :** विद्यमान सरपंचाची सहा महिन्यांच्या कालावधीसाठी किंवा नवीन निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत प्रशासक म्हणून नियुक्ती केली जाईल.

**•प्रशासकीय समिती :** केवळ सरपंचच नव्हे, तर गावाचा कारभार सुरळीत चालवण्यासाठी उपसरपंच आणि सर्व सदस्यांची मिळून एक 'प्रशासकीय समिती' स्थापन केली जाईल.

**•सीईओंकडे अधिकार :** जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना (CEO) या नियुक्त्यांचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

**निवडणुकीपर्यंत स्थानिक नेतृत्वाला बळ**

हा निर्णय केवळ प्रशासकीय नसून राजकीयदृष्ट्याही महत्त्वाचा मानला जात आहे. निवडणुका लांबणीवर पडल्या तरी गावची सत्ता विद्यमान लोकप्रतिनिधींच्याच हातात राहणार असल्याने ग्रामीण भागात या निर्णयाचे स्वागत होत आहे.

**प्रशासकाचा कालावधी किती?**

प्रशासक आणि प्रशासकीय समितीचा कालावधी त्यांच्या नेमणुकीपासून सहा महिने किंवा संबंधित ग्रामपंचायतीची निवडणूक पूर्ण होईपर्यंत, जे आधी होईल तेवढा राहणार आहे. हा तात्पुरता उपाय असून निवडणूक प्रक्रिया पूर्ण होताच नियमित निवडून आलेले पदाधिकारी कारभार स्वीकारतील.

**ग्रामीण भागातून संमिश्र प्रतिक्रिया**

एकीकडे सरपंचांना प्रशासकीय अधिकार मिळाल्याने स्थानिक नेतृत्वाला बळ मिळणार असले, तरी दुसरीकडे निवडणुका लवकर घेऊन लोकशाही प्रक्रिया पूर्ण करावी, अशी मागणीही विरोधी पक्ष आणि काही सामाजिक संस्थांकडून केली जात आहे. सरकारी अधिकाऱ्यांच्या हस्तक्षेपामुळे होणारा गोंधळ आता थांबणार असल्याने गावपातळीवर राजकीय वातावरण पुन्हा एकदा सक्रिय झाले आहे.






## नागपुरात बारावीचा पेपरफुटीचा धक्का; केमिस्ट्री प्रश्नपत्रिका व्हॉट्सॲपवर व्हायरल

**नागपूर :** राज्याची उपराजधानी नागपूरमध्ये बारावीच्या बोर्ड परीक्षेला पेपरफुटीचे ग्रहण लागले असून, यामुळे शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. शहरातील सेंट उर्सुला परीक्षा केंद्रावर विज्ञान शाखेचे 'केमिस्ट्री' आणि 'फिजिक्स'चे पेपर परीक्षेपूर्वीच व्हॉट्सॲपवर व्हायरल झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी सदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून संपूर्ण परीक्षा केंद्रावरील कर्मचाऱ्यांची तातडीने बदली करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हा सर्व प्रकार दुपारी 12 वाजेच्या सुमारास उघड झाला. परीक्षेदरम्यान एक विद्यार्थिनी स्वच्छतागृहात गेली होती. मात्र, 15 मिनिटे उलटूनही ती बाहेर न आल्याने पर्यवेक्षकांना संशय आला. तिची झडती घेतली असता तिच्याकडे मोबाईल सापडला. मोबाईलमधील व्हॉट्सॲप तपासले असता, 'XII' नावाच्या ग्रूपवर परीक्षेपूर्वीच सकाळी १० वाजून ३७ मिनिटांनी केमिस्ट्रीचा पेपर अपलोड करण्यात आला होता. या विद्यार्थिनीने दिलेल्या माहितीवरून दुसऱ्या एका विद्यार्थिनीच्या बॅगेतूनही मोबाईल जप्त करण्यात आला. या दोन्ही विद्यार्थिनी एकाच ग्रुपच्या सदस्या आहेत.

प्राथमिक चौकशीत विद्यार्थिनींनी असा दावा केला आहे की, एका खासगी शिकवणी वर्गाच्या शिक्षकाने पैशांच्या बदल्यात हा पेपर फोडला होता. ज्या 'XII' व्हॉट्सॲप ग्रुपवर हे पेपर शेअर करण्यात आले, त्यामध्ये एकूण 21 विद्यार्थी आहेत. हे विद्यार्थी शहरातील विविध केंद्रांवर परीक्षा देत असून, आता या सर्वांची पोलिसांकडून चौकशी केली जाणार आहे. या व्यवहारात मोठी आर्थिक देवाणघेवाण झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने कठोर पावले उचलली आहेत. सेंट उर्सुला केंद्रावरील सर्व शिक्षक आणि कर्मचाऱ्यांची तातडीने दुसऱ्या केंद्रावर बदली करण्यात आली आहे. शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी या प्रकरणाच्या सखोल चौकशीचे आदेश दिले असून दोषींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. "संबंधित सर्व विद्यार्थ्यांची आणि संशयास्पद व्यक्तींची चौकशी सुरू आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई निश्चित केली जाईल," असे नागपूर विभागाचे अध्यक्ष डॉ. शिवलिंग पटवे यांनी स्पष्ट केले.